# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. १५२-२३** **दिनांक :- १३/०५/२०२३**

## घरफोडी करणा-या आरोपीतास ६ तासात अटक करुन गुन्हयातील चोरी केलेली संपुर्ण मालमत्ता हस्तगत

## नवघर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

फिर्यादी नामे धीरज त्रिभुवन परमार, वय ५२ वर्षे, व्यवसाय कंत्राटदार, रा. रुम नं १०४/सी विंग, साई सरोवर बिल्डींग, आर.एन.पी.पार्के, काशी विश्वनाथ मंदिरासमोर, भाईंदर पुर्व, ठाणे हे दिनांक ०८/०५/२०२३ रोजी दुपारी ०२.०० वा. चे सुमारास त्यांचे नातेवाईकांचे घरी जोगेश्वरी-मुंबई येथे व त्यांच्या पत्नी मनिषा या देखील नातेवाईकांचे लग्न असल्याने शिळफाटा, कल्याण येथे घराला कुलुप लावुन गेल्या होत्या. त्यानंतर दिनांक ०९/०५/२०२३ रोजी रात्री २०.०० वा.चे सुमारास फिर्यादी यांचे घरी धुणी-भांडी करणारी मोलकरीण ही त्यांचे घरी झाडांना पाणी घालण्यासाठी तसेच साफसफाई करण्यासाठी गेली असता तिला घरातील बेडरुममधील सामान अस्ताव्यस्त पडलेले व लोखंडी कपाट उघडे असल्याचे दिसुन आले. सदर घटनेबाबत त्यांनी लागलीच फिर्यादी यांना फोन करुन कळविले. त्यानंतर फिर्यादी यांनी घरी येवुन पाहिले असता त्यांचे घरातील मास्टर बेडरुम मधील लोखंडी कपाटातील तिजोरी ही कोणत्यातरी हत्याराने तोडुन त्यातील रोख रक्कम ०२,६५,०००/- रुपये मिळुन आले नाहीत म्हणुन फिर्यादी यांनी सदरबाबत दिलेल्या फिर्यादीवरुन नवघर पोलीस ठाणेत दिनांक ११/०५/२०२३ रोजी गुन्हा रजि. नं. I ३१४/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४५७, ४५४, ३८० प्रमाणे नोंद करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने वरिष्ठांनी गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे नवघर पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी एस.व्ही रोड, भाईंदर पुर्व, भाईंदर रेल्वे स्टेशन, मिरारोड रेल्वे स्टेशन, नीलकमल नाका काशिमिरा व विटावा, ठाणे अशा वेगवेगळया ठिकाणी मिळून आलेल्या सी.सी.टी.व्ही. फुटेजचे तांत्रिक विश्लेषण करुन प्राप्त माहितीच्या आधारे आरोपीत नामे चेतन प्रकाश मोकाशी, वय ४० वर्षे, रा. रुम नंबर ०१/०२, बेलापुर रोड, जकात नाक्याजवळ, सुर्या नगर, मोकाशी चाळ, विटावा पुर्व, ठाणे यास निष्पन्न करुन त्यास माजीवाडा, ठाणे येथुन दिनांक ११/०५/२०२३ रोजी रात्रौ ०९.०० वा. ताब्यात घेवुन त्यास गुन्हया घडलेपासुन ६ तासात अटक केली. सदर गुन्हयातील आरोपी याच्याकडे पोलीस कोठडी दरम्यान तपास करुन गुन्हयात चोरी केलेली २,६५,०००/- रुपये रोख रक्कम अशी संपुर्ण मालमत्ता तसेच घरफोडी करण्यासाठी वापरलेले हत्यार ग्रॅण्डर मशीन, कटर व पक्कड असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.उप.नि. अभिजीत लांडे हे करीत आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०१, श्री. डॉ. शशीकांत भोसले, सहायक पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली नवघर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. विजय पवार, पो.नि. श्री. सुशिलकुमार शिंदे (गुन्हे), स.पो.नि. योगेश काळे, पो.उप.नि. अभिजित लांडे, पो.हवा. भुषण पाटील, सुरेश चव्हाण, नवनाथ घुगे, पो.अंम. ओंकार यादव, सुरजसिंग घुनावत यांनी केलेली आहे.




--------------ooooo--------------